| मुख्य अभियंता-१ मुंब्रा | |
|---|---|
| क्रमांक | दिनांक |
| ET-2-74 | 30/3/2022 |

प्राधिकरणाच्या /मंडळाच्या सेवेतून सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी/कर्मचा-यांना देय असलेले सेवानिवृत्तीनंतरचे लाभ त्वरित अदा करणेबाबत.

जा.क्र./प्राधि/परिपत्रक/२०२२/ १२३ /प्र.११
दिनांक : 29 MAR 2022

संदर्भ : १. सचिव/प्राधिकरण यांचे परिपत्रक क्र. से.नि.कर्म.सं./मागण्या/४३९/प्र. १५ दि. २४/०१/२००७.

२. परिपत्रक क्र. प्राधि/से.नि.क./मागण्या/२००७/२७४९/प्र. १५ दि. २१/०५/२००७.

परिपत्रक :

प्राधिकरणाच्या उपरोक्त परिपत्रकान्वये सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांना सेवानिवृत्तीनंतरचे आर्थिक लाभ अदा करणेबाबत सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. तथापी उपरोक्त परिपत्रकात विभागीय चौकशी चालू, प्रलंबित, अथवा प्रस्तावित असल्यास, प्रकरणे न्यायप्रविष्ट असल्यास, अथवा फौजदारी प्रकरणे प्रलंबित असल्यास करावयाच्या कार्यवाहीबाबत संदिग्धता असल्यामुळे संदर्भाधिन परिपत्रके अधिक्रमित करण्यात येत असून सदर प्रकरणी खालीलप्रमाणे सुधारित सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

१) अधिकारी/कर्मचारी सेवानिवृत्त होण्यापूर्वी त्यांच्या सेवेची पडताळणी सहा महिने अगोदर करण्यांत यावी म्हणजे त्याप्रमाणे ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त होऊन संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्याला सेवानिवृत्तीच्या दिवशी सेवानिवृत्तीचे आर्थिक लाभ जसे की रजेचे रोखीकरण व उपदानाची रक्कम अदा करणे शक्य होईल.

२) अधिकारी/कर्मचाऱ्याला निलंबित केल्यानंतर त्याचेवर तात्काळ दोषारोप पत्र बजावण्यात यावे. तद्नंतर त्या अनुषंगाने चौकशी अहवाल सादर करण्यात यावा म्हणजे संबंधित कर्मचारी निलंबनाधिन असताना सेवानिवृत्त झाल्यास त्यांच्या प्रकरणाचा निर्णय लवकरात लवकर लागण्यास मदत होईल.

३) निलंबनाधिन असताना जे अधिकारी/कर्मचारी सेवानिवृत्त झाले आहेत अशा अधिकारी/कर्मचाऱ्यावर विलंब न लावता दोषारोप पत्र बजावण्यात यावे व चौकशी सुरु करण्यात यावी. चौकशी लवकरात लवकर पूर्ण करुन अंतिम निर्णय घेण्यात यावा.

४) म. ना. से. ( शिस्त व अपील ) नियम १९७९ च्या नियम १० खालील विभागीय चौकशी सुरु करण्यात आली आहे. अशी प्रकरणे कोणत्याही परिस्थितीत तीन महिन्यात निकाली काढण्यात यावीत. तसेच म.ना.से. ( शिस्त व अपील ) नियम १९७९ च्या नियम ८ खालील विभागीय चौकशी प्रकरणे जास्तीत जास्त सहा महिन्यात निकाली काढण्यात यावीत.

५) अधिकारी/कर्मचारी यांचेविरुध्द ज्या प्रकरणी विभागीय चौकशी सुरु करावयाची आहे अशी प्रकरणे म.ना.से. ( शिस्त व अपील ) नियम १९७९ मधील भाग तीन नियम ५ ( पाच ते नऊ ) मधील जबर शिक्षा देण्याइतकी गंभीर नसल्यास अशा विभागीय चौकशा म.ना.से. ( शिस्त व अपील ) नियम १९७९ च्या नियम १० अन्वये प्रस्तावित कराव्यात.

AH
All to take note
of the circular.
31/3/22

६) सदयस्थितीत ज्या सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचा-यांच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडील किंवा इतर फौजदारी प्रकरणे चालू असून मा. न्यायालयाचा निकाल प्रलंबित आहे अशा प्रकरणी आर्थिक नुकसान नसल्यास सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांना त्यांचे निवृत्तीनंतरच्या सर्व देय रकमा त्वरित देण्यात यावीत. ज्या प्रकरणी चौकशी अधिकारी यांच्या अहवालानुसार अपचारी निर्दोष असल्यास अशा प्रकरणी विभागीय चौकशीचे अंतिम आदेश शिस्तभंगविषयक अधिकारी यांनी त्वरीत निर्गमित करावेत.

७) अधिकारी/कर्मचारी यांचेविरुध्द विभागीय चौकशी करण्याचे योजिले असल्यास तसेच सदर प्रकरणात आर्थिक नुकसानीच्या रकमेची गणना करुन दोषारोपात सदर रक्कम देखील नमूद करावी.

८) ज्या अधिकारी/कर्मचाऱ्यांविरुद्ध कोणतीही प्रकरणे प्रलंबित नाही अशा कर्मचाऱ्यांना सेवानिवृत्तीच्या अंतिम दिनी सेवानिवृत्तीचे वरील प्रमाणे आर्थिक लाभ अदा करण्यात यावेत.

**९) प्राधिकरणाच्या/मंडळाच्या ज्या अधिकारी/कर्मचाऱ्यांविरुद्ध विभागीय चौकशी अथवा फौजदारी अथवा न्यायालयीन प्रकरणे प्रलंबित आहेत, अशा प्रकरणात प्राधिकरणाचे/मंडळाचे कोणतेही आर्थिक नुकसान झालेले नाही. अशी संबंधित विभाग प्रमुखांची खात्री असेल व त्यांनी तसे प्रमाणित केले असेल तर अशा अधिकारी/कर्मचाऱ्यांस देय असलेले सेवानिवृत्ती नंतरचे लाभ देण्यांत यावेत. मात्र ज्या प्रकरणात प्राधिकरणाचे/मंडळाचे आर्थिक नुकसान झालेले आहे, असे प्रथम दर्शनी सिध्द होत असेल तेथे प्राधिकरणाच्या/मंडळाच्या झालेल्या आर्थिक नुकसानी एवढी रक्कम संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या सेवानिवृत्त लाभातून रोखून ठेवण्यांत यावी व उर्वरित रक्कम संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्यास अदा करण्यांत यावी.**

१०) अधिकारी/कर्मचारी सेवानिवृत्त होताना त्यांचे सेवानिवृत्तीचे जे लाभ अडविले जातात ते कोणत्या कारणासाठी अडविले जातात त्याबाबत संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्याला पत्राने सूचित करण्यात यावे.

**११) सेवानिवृत्तीच्या दिवशी अधिकारी/कर्मचारी निलंबाधिन असेल व संस्थेचे आर्थिक नुकसान केलेले असेल तर अशा निलंबाधिन अधिकारी/कर्मचाऱ्याच्या बाबतीत प्रकरणातील त्याच्या भागानुसार त्याच्याकडून आर्थिक नुकसानीची रक्कम वसूल करण्यात यावी व त्याला सेवानिवृत्तीनंतरचे आर्थिक लाभ अदा करण्यांत यावेत.**

**१२) अधिकारी/कर्मचारी सेवानिवृत्त होताना निलंबित असेल किंवा त्याच्याविरुद्ध विभागीय चौकशी सुरु असेल तेव्हा अशा अधिकारी/कर्मचाऱ्याने आर्थिक गुन्हा केला नसेल तर अश्या प्रकरणी सेवानिवृत्तीनंतरचे सर्व आर्थिक लाभ अदा करण्यांत यावेत.**

१३) अधिकारी/कर्मचारी निलंबाधिन असताना सेवानिवृत्त झाला व त्याच्या निलंबनाबाबतचा निकाल लागल्यानंतर त्याला देय असणारे सेवानिवृत्तीनंतरचे आर्थिक लाभ अदा करण्यांस विलंब झाला व सदर विलंब कार्यालयातील संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्यामुळे झालेला असेल तर आर्थिक लाभावरील व्याजाची रक्कम कार्यालयातील संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्याकडून वसूल करण्यांत यावी व बाधित अधिकारी/कर्मचाऱ्याला अदा करण्यांत यावी. मात्र विलंब हा बाधित अधिकारी/कर्मचाऱ्यामुळे झालेला असेल तर विलंब कालावधीकरिता व्याजाची रक्कम देय होणार नाही.

१४) प्राधिकरण/मंडळाअंतर्गत सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचा-यांची प्रलंबित असलेली प्रकरणे तात्काळ निकाली काढण्यात यावीत.

सदर परिपत्रक सर्व विभागप्रमुख, प्रादेशिक मंडळाचे मुख्य अधिकारी यांनी त्यांचे नियंत्रणाखालील सर्व अधिकारी/कर्मचारी यांचे निदर्शनास आणावे तसेच परिपत्रकातील सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी.

मा. उपाध्यक्ष/प्रा.
यांच्या मान्यतेने

( राजकुमार सागर )
सचिव/प्राधिकरण

प्रत :

१. मा. मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी/प्रा.
२. मुख्य अभियंता - १/२/३/प्रा.
३. वित्त नियंत्रक/प्रा.
४. विधी सल्लागार/प्रा.
५. उपमुख्य कार्यकारी अधिकारी/प्रा.
६. मुख्य वास्तुशास्त्रज्ञ व नियोजनकार/प्रा.
७. चौकशी अधिकारी/प्रा.
८. सक्षम प्राधिकारी - १/२/प्रा.
९. मुख्य जनसंपर्क अधिकारी/प्रा.
१०. मा. मुख्य अधिकारी/मुं.गृ.व क्षे.मं./मुं.दु.व पु.मं./
११. मुख्य अधिकारी/मुं.झो.सु.मं./को.गृ.व क्षे.मं./पुणे/अमरावती/ औरंगाबाद/ नागपूर/नाशिक मंडळ
१२. सहमुख्य अधिकारी/मुं.गृ.व क्षे.मं./मुं.दु.व पु.मं.
१३. मुख्य लेखाधिकारी// मुं.गृ.व क्षे.मं./ मुं.दु.व पु.मं./ मुं.झो.सु.मं./ को.गृ.व क्षे.मं./ पुणे/ अमरावती/ औरंगाबाद/ नागपूर/ नाशिक मंडळ

प्रत : प्रशासकीय अधिकारी - १/२/प्रा./मुंबई मंडळ/मुं.इ.दु.व पु.मं./मु.झो.सु.मं./कोकण मंडळ/पुणे मंडळ/औरंगाबाद मंडळ/नाशिक मंडळ/नागपूर मंडळ/अमरावती मंडळ
प्रत : उपाध्यक्ष/प्रा. यांचे स्वीय सहायक
प्रत : अध्यक्ष, महाराष्ट्र गृहनिर्माण कर्मचारी संघटना
प्रत : प्रधान कार्यवाह, मागासवर्गीय कर्मचारी संघटना
प्रत : अध्यक्ष, ग्रॅज्युएट इंजिनिअर्स असोसिएशन ऑफ म्हाडा
प्रत : कार्यासन अधिकारी/प्रा.
प्रत : प्रशासन ५,६,७,८,९,१०,११,१२,१३,१४,१५,१६,१७,१८